MERC

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६
ई-मेल: mercindia@mercindia.org.in / mercindia@merc.gov.in
वेबसाईट: www.mercindia.org.in / www.merc.gov.in

जाहिरात क्र.४/२०१३-१४

## जाहीर सूचना

**सन २०११ चे प्रकरण क्र.३३**

**विषय: मे. इक्सोरा कन्स्ट्रक्शन (प्रा.) लि. च्या पनवेल विशेष आर्थिक क्षेत्रासाठीच्या प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१३ वर जनतेकडून सूचना आणि हरकती मागविण्याबाबत**

मे. इक्सोरा कन्स्ट्रक्शन (प्रा.) लि. यांना वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडून विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ अंतर्गत मे. सन्नी विस्ता रियल्टर्स (प्रा.) लि. विकसित करीत असलेल्या पनवेल येथील विशेष आर्थिक क्षेत्रासाठी ''सह-विकासक'' म्हणून घोषित करण्यात आले आहे.

विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ (SEZ Act) च्या कलम ४ च्या उप-कलम (१) सह विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ (ब) नुसार, मे. इक्सोरा कन्स्ट्रक्शन (प्रा.) लि. हे, भारत सरकारने विशेष आर्थिक क्षेत्र अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, पनवेल येथील विशेष आर्थिक क्षेत्रामधील ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यासाठी वितरण यंत्रणेचे संचालन आणि देखभाल करण्यासाठी, मानीव वीज वितरण परवानाधारक आहे. आयोगाने सन २०११ च्या प्रकरण क्र.३३ मध्ये दि. २६ ऑगस्ट, २०१२ रोजी दिलेल्या आदेशान्वये मे. इक्सोरा कन्स्ट्रक्शन (प्रा.) लि. यांना मानीव वीज वितरण परवानाधारक म्हणून मान्यता दिली आहे.

आयोगाने, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १६ अंतर्गत, प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१३ तयार केले आहेत. सदर प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१३ ची प्रत आयोगाचे संकेतस्थळ www.mercindia.org.in / www.merc.gov.in येथे उतरवून घेण्याजोग्या स्वरुपात उपलब्ध आहे. आयोग, याद्वारे उपरोक्त प्रारुपावर जनता/हितसंबंधितांकडून सूचना आणि हरकती मागवित आहे. या सूचना आणि हरकती (१+५ प्रतींमध्ये), सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, यांना १३ वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०००५, (फॅक्स -०२२-२२१६३९७६; ई-मेल: ixoralicence2013@merc.gov.in) या पत्त्यावर दि.१० मे, २०१३ रोजी किंवा त्यापूर्वी मिळतील अशा रितीने पाठवाव्यात.

दि. १० मे, २०१३ रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेल्या सर्व सूचना आणि / किंवा हरकती आयोगाकडून विचारात घेण्यात येतील.

**मुंबई,** **स्वाक्षरी/-**

**दिनांक: १२.०४.२०१३** **सचिव, मविनिआ**